**सं.फौ.ख. क्र.५११/२०२१**
**नितीन वि. शामल**
**नि.क्र.४८ पुढे सुरु.**

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.२ ची पुढील उलटतपासणी शपथेवर सुरु**
**आरोपीतर्फे विधिज्ञ श्री ए. एल. देवकर -**

४. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीशी माझे चांगले संबंध आहेत. फिर्यादीने आरोपीला नेमके कधी पैसे दिले होते ती निश्चित अशी तारीख मला सांगता येणार नाही. उसनवार पावतीची तारिख सुध्दा मला सांगता येणार नाही. ती तारीख ०३.०२.२०२० असल्याचे मला सांगता येणार नाही. फिर्यादीने आरोपीला दिनांक ३१.०१.२०२० रोजी पैसे दिल्याचे मला सांगता येणार नाही. फिर्यादीने आरोपीस पैसे दिल्याच्या १ महिन्यानंतर कथित उसनवार पावती तयार केल्याचे मला सांगता येणार नाही. उसनवार पावतीचा स्टॅम्प आरोपीने घेतला होता. तो कधी खरेदी केला होता हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, कथित व्यवहार झाल्यानंतर मी उसनवार पावतीवर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे फिर्यादीने आरोपीला पैसे दिले किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. रक्कम देताना मी प्रत्यक्ष पाहिले होते. एन.ई.एफ.टी. च्या पावतीची तारीख मला सांगता येणार नाही.

५. हे म्हणणे खरे आहे की, उसनवार पावती करतेवेळी आरोपीने फिर्यादीस सुरक्षेपोटी काही धनादेश दिले होते. उसनवार पावतीवर सही करतेवेळी माझ्यासह एकूण चार जनांनी सह्या केल्या होत्या. त्यावर अंगठे नव्हते. आता मला **नि.क्र.५४** वरील पावती दाखविण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, त्यावर अंगठे दिसून येतात. साक्षीदार सांगतो की, ते अंगठे आरोपी व फिर्यादी यांचे आहेत. फिर्यादी व आरोपी यांच्यातील व्यवहार उसनवारीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीच्या सांगण्यानुसार साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा व्यवहार माझ्या समक्ष कधीही झालेला नव्हता.

***उलटतपास पुर्ण, फेरतपास काहीही नाही.***

समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

(आर. एम. भेंडे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वाई

दिनांक :- २०.०३.२०२६.